जा.क्र.प्रा/प्राशि/अप्राशा/जा-तु/पीआर
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे १ यांचे कार्यालय,
दिनांक :- २२/४/९६

प्रति,

१) शिक्षणाधिकारी ( प्राथमिक )
जिल्हा परिषद, पुणे विभाग.

२) प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,
---------- ------------

३) शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ५.

विषय:-मान्यताप्राप्त अनुदानित/~~विनाअनुदानित/कायम विना अनुदानित~~ खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविण्यांत आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास/जादा तुकडीस जून १९९६ पासून अनुदान/~~विनाअनुदान/कायम विनाअनुदान~~ तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी/नैस.वाढ | शेरा/मंजूर |
|---|---|---|---|---|---|
| १) | वनराज परिवार विद्यामंदिर कोथरूड | मराठी | इ.१ ली | २ तुकडी | मंजूर |

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे १.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१) मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
वनराज परिवार विद्यामंदिर
कोथरूड, पुणे

-/२...

विनाअनुदान तत्वावर

[redacted]

२६३३७३८

जा.क्र प्राशि/खाप्राशा/वर्ग-तुकडी/मंजूरी/पुवि/०१
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 13 DEC 2001

प्रति,

[redacted] (प्राथमिक),
जिल्हा परिषद,
२. शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.
३. [redacted],
[redacted]/नगरपालिका शिक्षण मंडळ,

**विषय** : मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/[redacted] खाजगी प्राथमिक शाळेस सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षी [redacted]/अतिरिक्त [redacted]/वाढीच्या [redacted]/तुकडया मंजूर करणेबाबत.

**संदर्भ** : प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे क्र.खाप्राशा/२०००/तुमा-२/६०७३२/ड-५१२, दिनांक २९.११.२००१

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार करता उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळेस त्याचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या [redacted] अतिरिक्त [redacted]/वाढीच्या [redacted]/तुकडया [redacted]/विनाअनुदान/[redacted] तत्वावर जून, २००० पासून सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत [redacted] आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी वाढ. नैसर्गिक/अतिरिक्त |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | वनाझ परिवार विद्यामंदीर कोथरुड | मराठी | इ. २री ३री व ४थी ची दुसरी तुकडी | अतिरिक्त |

अटी व शर्ती.

१. ज्या शाळांना जून, २००० पासून विनाअनुदान तत्वावर वर्ग/तुकडया मंजूरी देण्यात आलेली आहे या वर्ग/तुकडया भविष्यात जून, २००४ पासून अनुदानास पात्र ठरवितांना शासन निर्णय क्रमांक-व्हीएलएस-१०००/(२४५५)/प्राशि-१, दिनांक ८.५.२००० मधील अटी व निकषांचा अवलंब करावा व अनुदानास पात्र ठरणा-या या वर्गाला/तुकडयांना आवश्यक असणारी आर्थिक तरतूदीची मागणी जिल्हा नियोजन,समितीकडे त्यावर्षी उपलब्ध करुन घेण्याची दक्षता संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद/शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ यांनी घ्यावी.
२. शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
३. सदर शाळेने वर्ग/तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन घ्याव्यांत.
४. सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सुविधा चांगली असणे आवश्यक आहे.
५. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या वर्ग/तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील पट व उपस्थितीवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
७. सदर शाळेच्या मंजूर करण्यांत आलेल्या या वर्ग/तुकडीत विद्यार्थी संख्या कायम पुरेशी असणे आवश्यक आहे.
८. तपासणी अंती एक जरी अट अथवा शर्त नियमबाह्य निदर्शनास आल्यास वर्ग/तुकडी मंजूरी रद्द करण्यात येईल.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१

अनिता

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
१. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
२. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका वनाझ परिवार विद्यामंदिर कोथरुड.